# चित्रपटांचा संशोधकीय अभ्यास होणे आवश्यक



कोल्हापूर(प्रतिनिधी):- चित्रपटांचा कलेच्या पलिकडे जाऊन विविधांगांनी संशोध कीय अभ्यास होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सिनेसाक्षरता वाढविण्यासाठीही प्रयत्न करण याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन प्रा. माया पंडित यांनी केले. त्या 'अंडर द लेन्स: फिल्म्स, जेंडर अँड कल्चर' या पुस्त काच्या प्रकाशन सोहळ यात बोलत होत्या. शिवाजी विद्या पीठाच्या इंग्रजी विभागा तर्फे अंडर द लेन्स: फिल्म्स, जेंडर अँड कल्चर' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा झाला. हे पुस्तक इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी आणि डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी संयुक्त रित्या संकलित व संपादित केले आहे. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून ईएफएल विद्यापीठाच्या माजी प्र-कुल गुरू प्रा. माया पंडित व चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठा डिया उपस्थित होते. कार्यक्र माच्या अध्यक्षस्थानी विद्या पीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते. प्रा. माया पंडित म्हणाल्या, कोल्हापूरने भारतीय सिनेमाच्या जडणघडणीत दिलेले योगदान अत्यंत महत्वपूर्ण आहे, याचे विसमरण होऊ देता कामा नये. आपल्या कोल्हापुरात सिनेमा आणि संस्कृती व लिंग भावना या अतिशय महत्त्वाच्या विषयावर परिषद होते आणि त्यातील चर्चेचे पुस्तकरुपाने प्रकाशन होते आहे, याचा सार्थ अभिमान वाटतो. त्यांनी आपल्या भाषणात कोल्हापूर आणि भारतीय सिनेसृष्टीची सुरवात व प्रवास उलगडला. विविध उदाहरणे देऊन सेन्सॉरशीप, स्त्रीचे क्रयवस्तू म्हणून सादरी करण याविषयीही मांडणी केली. चित्रपटांकडे पाहण्याचा निकोप दृष्टीकोन विकसित होण्यासाठी शिक्षणामध्ये सिनेमाला स्थान देण्याची गरज त्यांनी यावेळी अधोरेखित केली. चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडीया यांनी चित्रपटांचा समाजव्यवस्थेवर होणारा परि णाम याविषयी विवेचन केले. समर नखाते यांचा पुस्तकातील लेख सिनेमाचे बदलते स्वरूप आणि सामाजिक वास्तव समजावून घेण्याच्या दृष्टीने मह त्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले, हिंदी, मराठी, इंग्रजी, कन्नड तसेच इटालियन सिनेमाच्या विवेचनामुळे हे पुस्तक बहुसांस्कृ तिक झाले आहे. या सर्वच सांस्कृतिक परिस्थितीमध्ये स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन मात्र फारसा वेगळा नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. प्रका शित केली जाणारी पुस्तके अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचा वीत, यासाठी ती ऑडिओबुक स्वरूपात देखील तयार करण यात यावीत, अशी सूचना त्यांनी केली. डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी स्वागत, प्रास्ताविक व परिचय करून दिला. त्यानंतर प्रा. तृप्ती करे कट्टी यांनी पुस्त काचा आशय व प्रकाशना मागील उद्देश स्पष्ट केला. यानंतर मान्य वरांच्या हस्ते पुस्तकाचे लोका र्पण करण्यात आले. मेघा कांबळे यांनी सूत्रसंचालन केले, तर सुप्रिया पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमाला व्यवस्था पन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, अधिसभा सदस्य मिठारी, डॉ. पारिजात, डॉ. डी. एन. पाटील, डॉ. अरुंधती पवार, डॉ. श्रुती जोशी, यांच्या सह इंग्रजी विभागातील शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंडर द लेन्स: फिल्म्स, जेंडर अँड कल्चर' या पुस्तकात २८ फेब्रुवारी ते १ मार्च २०२२ या कालावधीत पार पडलेल्या 'एक्सप्लोरिंग द इंटरसेक्शन ऑफ लिटररी स्टडीज, फिल्म स्टडीज अँड जेंडर स्टडीज' या आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय वेबिनारमध्ये सादर करण्यात आलेल्या निवडक शोधनिबंधांचे संकलन करण्यात आले आहे. क्रिसेंट पब्लिशिंग कॉर्पोरेशन, नवी दिल्ली यांनी ते प्रकाशित केले आहे.

जनसंपर्क कक्ष
2 9 MAY 2023 क्रांतीसिंह शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील आठ विद्यार्थी उत्कृष्ट युवा संसदरत्न

कोल्हापूर(प्रतिनिधी):- शिवाजी विद्यापीठात नुकत्याच झालेल्या सोळाव्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेअंतर्गत विद्यापीठातील आठ विद्यार्थ्यांची उत्कृष्ट युवा संसदरत्न म्हणून निवड झाली. यामध्ये पवन पाटील, असिया जमादार, अनमोल पाटील, श्रेया म्हापसेकर, प्रतीक्षा पाटील, सिमरन घाशी, ऋतिका धनगर, प्रतीक्षा कांबळे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विशेष बाब म्हणजे यामध्ये सात विद्यार्थिनींचा समावेश आहे.

संसदीय कार्य मंत्रालया मार्फत बक्षीस वितरण समारंभा साठी विद्यापीठातील समन्व यक डॉ. प्रल्हाद माने यांच्यासह निवड झालेल्या आठ विद्या र्थ्यांना नवी दिल्ली येथे निमंत्रित होणार असल्याचे केंद्रीय संस दीय कार्यमंत्रालयाचे उपसचिव ए.बी.आचार्य यांनी जाहीर केले. या राष्ट्रीय संसद स्पर्धेसाठीच्या संघ निवडीचा अंतिम निकाल कालांतराने जाहीर होणार आहे. विद्यापीठाच्या संगीत व नाट्य शास्त्र अधिविभागाच्या सभागृहात आयोजित राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेमध्ये स्वच्छ भारत, कृषी, आरोग्य, महिला सक्षमीकरण, नवीन शैक्षणिक धोरण,आर्थिक धोरण, संरक्षण इत्यादी विषयांवर अभ्या सपूर्ण चर्चा झाली.या स्पर्धेस निरीक्षक म्हणून उपसचिव आचार्य, शिक्षणतज्ज्ञ प्रा.एस.बी. देओसकर उपस्थित होते.स्पर्धा यशस्वी होण्यासाठी कुलगुरू डॉ. शिर्के,प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

2 9 MAY 2023

जनसंपर्क कक्ष
प्रतीसिंह शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरूणपिढी देशाच्या शाश्वत विकासाचे ग्रोथ इंजिन



कोल्हापूर(प्रतिनिधी):- तरुणपिढी ही राष्ट्रीय शाश्वत विकासाचे ग्रोथ इंजिन आहे. त्यामुळे तरुणांनी मूल्याधिष्ठित जाणीवा मनाशी बाळगून राष्ट्र विकासाच्या कार्यात सहभाग घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठात १६ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धे अंतर्गत राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा पार पडली. या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाच्या संगीत व नाट्य शास्त्र अधिविभागाच्या सभागृहातील स्पर्धेस निरीक्षक म्हणून केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव ए.बी. आचार्य आणि शिक्षणतज्ज्ञ प्रा. एस.बी. देओसकर उपस्थित होते.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, राष्ट्रीय युवा संसद उपक्रमाच्या माध्यमातून सांविधानिक लोकशाहीची मूल्ये युवा पिढीमध्ये रुजविण्याच्या दिशेने केंद्रीय मंत्रालय अतिशय सकारात्मक प्रयत्न करीत आहे. हा उपक्रम देशभरातील विद्यापीठांमध्ये राबविला जातो. यामुळे युवा पिढीच्या व्यक्तिमत्त्वाला नवे आयाम प्राप्त होतात, तसेच त्यांचे भवितव्यही मूल्याग्रही बनते. या माध्यमातून भारताची विविधतेमधील एकता आणि बहुसांस्कृतिकतेमधील एकात्मताही युवकांच्या जाणीवेच्या कक्षेमध्ये रुजतात. यातून भारताचा चांगला नागरिक म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होते.

कार्यक्रमास प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड आदी उपस्थित होते. दरम्यान, युवा संसदेमध्ये सुमारे तासभर विविध विषयांच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांनी स्वच्छ भारतची शपथ घेतली. समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संतोष सुतार यांनी आभार मानले.

**परस्परांबद्दलची मने स्वच्छ होणे आवश्यक**-यंदा आपण स्वच्छ भारत ही संकल्पना घेऊन हा उपक्रम साजरा करीत आहोत. केवळ भौतिक स्वच्छता करणे, यातून अभिप्रेत नसून स्वच्छतेचा संस्कार जनमानसात रुजणे आणि लोकांची परस्परांबद्दलची मनेही स्वच्छ व पारदर्शक होणे नितांत आवश्यक असल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले.